# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चेंबुर (मुंबई) येथील मिठागरांच्या जागेवर झोपडपट्टी उभारण्यात येत असल्याबाबत

**(१) ३२३०७ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर (मुंबई) येथील पी.एल.लोखंडे मार्गावरील नागवाडी झोपडपट्टीला लागून असलेल्या मिठागरांच्या मोकळ्या जागेवर मोठया प्रमाणात झोपडपट्टी उभारण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय जागांवर अतिक्रमण करणा-या बेकायदा झोपड्यांच्या निष्कासनासाठी शासन काही ठोस उपाय करणार आहे काय,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :**(१) व (२) मौजे चेंबुर येथील पी.एल. लोखंडे मार्गा नजीक नागवाडी या स्थानिक नावाने ओळखली जाणारी झोपडपट्टी आहे. मौजे चेंबुर येथील न.भू. क्र. ६६१ अ व ६६१ब या मिळकती मिठागरांच्या असून मिळकत पत्रिकेवर “भारत सरकार” अशी नोंद दाखल आहे.

सदरहू जमिनी केंद्र शासनाच्या मालकीच्या असल्याने त्यावरील अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही केंद्र शासनाच्या संबंधित विभागामार्फत अपेक्षित असून या कामी त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### स्वातंत्र्य सैनिक गणपत खरोटे यांच्या मोखाडा (जि.पालघर) येथील स्मारकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२) ५०३५१ (२५-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथे सन १९९३ मध्ये शासनाने उभारलेल्या स्वातंत्र्य सैनिक गणपत खरोटे यांच्या स्मारकाची दुरवस्था झाली असून सदर स्मारकाची दुरुस्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कोणत्याही लोकप्रतिनिधींनी स्वातंत्र्य सैनिक गणपत खरोटे या स्मारकाच्या दुरूस्तीबाबत मागणी केलेली नाही. तथापि मोखाडा तालुक्यातील नागरिकांनी हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्तीची मागणी केली होती.
(२) मोखाडा येथील हुतात्मा स्मारकाची देखभाल व दुरूस्ती जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मोखाडा यांच्याकडे असून, सदर हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्तीच्या अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी दि.२०/०८/२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर कामास कार्यकारी अभियंता, जि. प. (बांध) पालघर यांच्यामार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहे. पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत शेकडो कोटी रुपयांची करमणुक कराची थकबाकी असल्याबाबत**

**(३) ५६३७४ (२५-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील करमणूक कर विभागाच्या दुर्लक्षपणामुळे शेकडो कोटी रुपयांची करमणुक कराची थकबाकी असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने करमणूक कराची कोट्यावधी रुपयांची असलेली थकबाकी वसुल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८)** :(१), (२) व (३) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यांसाठी निश्चित करण्यात आलेल्या करमणूक शुल्काच्या वसूलीचे उद्दिष्ट १००% पूर्ण करण्यात आले असून त्या व्यतिरिक्त प्रलंबित असलेल्या करमणूक शुल्काच्या थकबाकीची रक्कम महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार वसूल करण्याची कार्यवाही क्षेत्रीय पातळीवर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विभागातील नायब तहसिलदारांची ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाली नसल्याबाबत**

**(४) ६६८७७ (२४-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन अधिसूचना दिनांक ८ जून, २०१० अन्वये राजपत्रित व अराजपत्रित पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० मध्ये केली असतांना देखील कोकण विभागातील नायब तहसिलदार यांची ज्येष्ठता यादी आजपर्यंत प्रसिध्द झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१६ अन्वये पदोन्नतीची प्रकिया पूर्ण होण्याच्या दृष्टीने वेळापत्रक तयार केलेले असतांनाही कोकण विभागातील नायब तहसिलदार पदांच्या पदोन्नतीची विहित कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकण विभागातील नायब तहसिलदारांची अनेक वर्षापासून तहसिलदार पदी पदोन्नती न झाल्यामुळे अव्वल कारकून पदोन्नतीपासून वंचित राहिले असून त्यातील काही अव्वल कारकून सेवानिवृत्त्त झाले आहेत व काही सेवानिवृत्ती होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तहसिलदार पद पदोन्नतीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) नायब तहसिलदार संवर्ग हा विभागीय संवर्ग आहे. यासंवर्गात सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना विभागीय संवर्ग नियमावली लागू आहे.

कोकण विभागातील नायब तहसिलदार संवर्गाची दि. १/१/२०१० ते १/१/२०१३ अखेरची अंतिम जेष्ठता यादी दि. २५/२/२०१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जेष्ठता सुचीतील स्थानाच्या अनुषंगाने काही नायब तहसिलदारांनी मा.मॅट, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज ९६६/२०१४ मधील आदेशानुसार कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी पातळीवरील सन १९८२ पासुन जेष्ठता याद्या सुधारित करुन दिनांक १०/२/२०१६ रोजी अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाची अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द् करण्यात आली.

कोकण विभागातील नायब तहसिलदार संवर्गाच्या सन १९९९ पासुनच्या तदर्थ पदोन्नत्या नियमित झालेल्या नाहीत. करीता सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाच्या सुधारित जेष्ठता याद्या प्रसिध्द करुन नायब तहसिलदार संवर्गाच्या तदर्थ पदोन्नत्या नियमितीकरणाच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेवून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनंतर नायब तहसिलदार संवर्गाची अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

तदर्थ पदोन्नत्या नियमितीकरणाअधिन अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाच्या प्रचलीत जेष्ठता सूचीनुसार नायब तहसिलदार संवर्गात वेळोवेळी तदर्थ पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.

---

**पुण्यातील ससून रुग्णालयातील विद्युत कामांच्या कंत्राटाबाबत**

**(५) ६८२६३ (०७-०१-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील ससून रुग्णालयातील विद्युत कामांच्या कंत्राटासंदर्भात ई-निविदेतील अटींची पूर्तता न करणा-या कंत्राटदाराला कंत्राट दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राट देवून १० महिने झाले तरी ठेकेदाराने काम सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अटींची पूर्तता न करणा-या व काम सुरु करण्यास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे येथील ससून रूग्णालयाच्या नवीन इमारती मध्ये सुरक्षा व आग नियंत्रणाकरीता फायर अलार्म व स्मोक डिटेक्शन सिस्टिम बसविण्याच्या कामाच्या निविदा प्रक्रियेसंदर्भात अनियमितता झाल्यासंदर्भात तक्रारवजा निवेदन लोक प्रतिनिधींकडून माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) निविदा प्रक्रियेतील अनियमिततेसंदर्भात अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) शासन मान्यतेनुसार शासनाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संबंधित कंत्राटदाराकडून काम पूर्ण करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**कसबा बावडा (जि.कोल्हापूर) येथील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालय बंद असल्याबाबत**

**(६) ७४०२९ (२१-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील लोकांचा त्रास कमी करण्यासाठी कसबा बावडा येथील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालय करवीर क्र.३ ह्या प्रशासकीय इमारतीत नवीन कार्यालय उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या कार्यालयात अधिकारी व कर्मचारी अद्याप स्थलांतरित झाले नसून कार्यालय बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कसबा बावडा येथील सह दुय्यम निबंधक वर्ग-२, करवीर क्र.३ हे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत दि.०६.०२.२०१७ रोजी स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तहसिल कार्यालय नाशिक येथील फाईल गहाळ झाल्याबाबत**

**(७) ७४२५६ (१२-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिल कार्यालय नाशिक येथील जमिनींच्या टेनन्सीअंतर्गत सुनावणी झालेल्या खटल्यांच्या अनेक नस्ती गहाळ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदारांनी मागणी केलेल्या कुळकायद्यांतर्गत प्रकरणा संदर्भात ४ नस्ती आढळ न झाल्याने तहसिलदार, नाशिक यांनी त्याप्रमाणे संबंधित अर्जदारास सन २०१५-१६ मध्ये कळविलेले आहे.

(२) व (३) तहसिलदार, नाशिक यांनी प्रकरणी संबंधित कुळकायदा लिपीक यांना फेरिस्त तसेच चार्ज हस्तांतरण यादी सादर करणेबाबत दिनांक २५/५/२०१६ च्या पत्रान्वये कळविले असून

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन प्राप्त मार्गदर्शनानुसार लिपीक (आस्थापना), तहसिल कार्यालय, नाशिक यांना कुळकायदा संकलनाचे सन १९९६ ते २००० या कालावधीचे दरम्यान तहसिलदार,नायब तहसिलदार, अव्वल कारकुन यांची यादी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. त्यानुसार प्राप्त माहितीवरुन पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच तहसिलदार नाशिक यांच्या दिनांक १४/१२/२०१६ व दिनांक १७/३/२०१७ च्या पत्रान्वये टेनन्सी केस ०८/२००३ व टेनन्सी केस क्र.१०/२००३ याबाबत तत्कालिन लिपीक यांना चार्ज यादी सादर करण्याबाबत कळविले आहे.सदर प्रकरणी आवश्यक कागदपत्रे तसेच संबंधित कर्मचारी यांचा खुलासा प्राप्त झाल्यावर त्यात संबंधित दोषी आढळुन आल्यास कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील अक्कलपाडा डावा कालवा, अक्कलपाडा उजवा कालवा, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व पारधी समाजासाठी एस.टी. प्रवर्गातून मंजूर घरकुल योजनेबाबत**

**(८) ७४४९८ (१४-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील अक्कलपाडा डावा कालवा, अक्कलपाडा उजवा कालवा, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व पारधी समाजासाठी एस.टी. प्रवर्गातून मंजूर घरकुल योजना यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास पत्र देऊनही बैठक लावण्याबाबत अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर बाबींवरील बैठक लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) धुळे जिल्हयातील अक्कलपाडा डावा कालवा, अक्कलपाडा उजवा कालवा, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व पारधी समाजासाठी एस.टी प्रवर्गातून मंजूर घरकुल योजना या विषयाबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दालनात स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत दि.१३.०६.२०१७ रोजी बैठक घेण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर प्रकरणी बैठक यापूर्वी माहे जानेवारी, २०१७ तसेच माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये आयोजित करण्यात आली होती. परंतू प्रशासकीय कारणास्तव तसेच दरम्यान पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता लागू झाल्याने वेळोवेळी सदर बैठक पुढे ढकलावी लागली.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील कोलंविका देवी ट्रस्टला देवस्थानासाठी शासनाने दिलेल्या जमिनीबाबत**

**(९) ७६४५६ (१२-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील कोलंविका देवी ट्रस्टला देवस्थानासाठी शासनाने दिलेली २०० एकर जमीन तत्कालीन महसूल राज्यमंत्र्यांनी स्वेच्छाधिकारान्वये बेकायदेशीरपणे कुळाचे नाव लावून धनाढ्य बिल्डर्सच्या नावावर करुन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोलंविका देवी ट्रस्टने सदर जमीन परत मिळण्याबाबत मा.महसूल मंत्री व महसूल विभागाकडे लेखी निवेदनाव्दारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोलंविका देवी ट्रस्टला देवस्थानासाठी दिलेली जमीन परत मिळवून देण्याबाबत तसेच सदर जमीन बेकायदा बळकावणाऱ्या बिल्डरवर व त्यास मदत करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१८) :** (१) मौजे त्र्यंबकेश्वर, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथील गट नं.३०१, ३२१, ३२७, ३२५, ३२३, ३२२/२, ३२८, ३५८, ३२४, ३००, ३२६ या जमिनीवरील देवस्थान इनाम वर्ग-३ शेरा कमी करून मिळणेकामी अर्जदार सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर ५ यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर मा. राज्यमंत्री (महसूल) यांच्याकडे अर्धन्यायिक सुनावणी होऊन त्यांच्या आदेश दि.१३.०५.२०१४ अन्वये अर्जदार यांचा अपील अर्ज मंजूर करण्यात येऊन उक्त जमिनीची सारामाफी सवलत काढून जमीन भर आकारी करण्याबाबत तसेच सदर जमीन देवस्थान इनाम वर्ग-३ मधून कमी करण्यासंदर्भात आदेश पारित करण्यात आले आहेत. उक्त आदेशानुसार गावी दप्तरी नोंद नं.२३२८, दि.२७.०६.२०१४ रोजी प्रमाणित करण्यात आलेली आहे.

(२) प्राप्त अभिलेखात तपासणी केली असता कोलंविका देवी ट्रस्टचे लेखी निवेदन शासनास प्राप्त झाल्याची नोंद दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) शहरालगत असलेल्या रजतनगर येथील जमिन अकृषक करण्याबाबत**

**(१०) ८१४३६ (१२-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) शहरालगत असलेल्या रजतनगर येथील सर्वे नं.१५१/१ मधील १ हेक्टर, ३७ आर जमिन अकृषक करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे आदेश एनएपी-३४/मलकापूर/४४/दि.७.१२.१९९९ नुसार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबतच्या कागदपत्रांची मागणी माहितीच्या अधिकारान्वये सदर कार्यालयाकडे केली असता त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नसल्याची माहिती देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर प्रकरणातील कागदपत्रे गहाळ होण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलढाणा येथील सर्व्हे नं. १५१/१ मधील १.३७ हे. आर जमीन निवासी प्रयोजनाकरिता उप विभागीय अधिकारी, मलकापूर यांचे दि.०७/१२/१९९९ रोजीच्या आदेशान्वये अकृषक करण्यात आली आहे.

श्री. नंदकिशोर भेरुलाल वर्मा, रा. मलकापूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि.१७/०१/२०१७ रोजीच्या अर्जान्वये उक्त प्रकरणाच्या कागदपत्रांची मागणी केली होती. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, उप विभागीय अधिकारी, मलकापूर यांचे कार्यालय यांनी उक्त अर्जदाराने आवश्यक शुल्क भरल्यानंतर दि. १०/०२/२०१७ रोजी त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निम्न पेढी (ता.भातकुली, जि.अमरावती) प्रकल्पग्रस्तांना केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(११) ८१७२२ (१८-०४-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न पेढी (ता.भातकुली, जि.अमरावती) प्रकल्पा अंतर्गत मौजे अळणगाव,निंभा, वासेवाडी, कुंड खुर्द, कामूंजा, कुंड व इतर गावे या गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीला केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार मोबदला मिळण्यात यावा यासाठी लोकप्रतिनिधिनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे बैठक घेऊन योग्य त्या कार्यवाहीचा प्रस्ताव शिफारशीसह मा.मुख्यमंत्री यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

निम्न पेढी (ता.भातकुली, जि.अमरावती) प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्त शेतक-यांना त्यांच्या जमिनीला केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार मोबदला मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०५.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) निम्नपेढी प्रकल्प संघर्ष समिती,अमरावती यांचे दि.१४.०८.२०१७ रोजीचे निवेदन व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाची अधिसूचना दि.०९.०२.२०१६ नुसार निश्चित केलेला २ गुणांक नुसार दि.०१.०१.२०१४ नंतरच्या सर्व निवाड्यांना लावून मोबदला पुनर्निश्चित करणेबाबत विनंती केली आहे. याबाबत विधी व न्याय विभागाकडे या विभागाची नस्ती क्र.संकिर्ण-०९/२०१७/प्र.क्र.१२९/अ-२ अन्वये अभिप्रायार्थ विचारणा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक प्रकल्प राबविताना प्रथम जमीनीचा ताबा घेऊन त्यानंतर प्रकल्प कार्यान्वीत करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(१२) ८५७१२ (१९-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सार्वजनिक वाहतूक, सिंचन, जलविद्युत प्रकल्प, मोठे पाणी पुरवठा प्रकल्प आणि पर्यटन विकासासाठीचे प्रकल्प व मेट्रो, मोनो, रेल्वे, विमानतळ, बंदर विकास, राष्ट्रीय-राज्य महामार्ग व औद्योगिक क्षेत्राचा विकास आदी प्रकल्पांसाठी प्रथम जमीनीचा ताबा घेऊन त्यानंतर प्रकल्प कार्यान्वीत करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कार्यपध्दती निश्चीत केली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१८) :** (१) शासन निर्णय क्रमांक: जमीन-२०१५/प्र.क्र.४५/ज-१, दिनांक १ जून, २०१७ अन्वये शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या महत्वाच्या प्रकल्पांना आवश्यक शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(२) व (३) मंत्रिमंडळाने किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या सार्वजनिक वाहतूकीशी निगडीत मोठे प्रकल्प, मोठे/मध्यम सिंचन प्रकल्प व जलविद्युत प्रकल्प, मोठे पाणी पुरवठा प्रकल्प, पर्यटन विकास महामंडळाचे किंवा पर्यटन संचालनालयाचे मोठे पर्यटन प्रकल्प व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विकसित करावयाचे औद्योगिक क्षेत्र या निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पांचा उक्त धोरणात समावेश आहे.

ज्या निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पांना या शासन निर्णयापूर्वीच मंत्रिमंडळ किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता असून अद्याप शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा प्राप्त झाला नसेल अशा प्रकल्पांना तसेच १ जून, २०१७ नंतर अशी मान्यता मिळालेल्या प्रकल्पांना प्रस्तुत धोरण लागू राहील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथे ऑनलाईन सातबाऱ्याच्या नोंदी करणाऱ्या सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी निर्माण झाल्याबाबत**

**(१३) ८५८७१ (१९-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथे ऑनलाईन सातबाऱ्याच्या नोंदी करणा-या सॉफ्टवेअर मधील त्रृटीमुळे शेतीच्या ८-अ उताऱ्यामध्ये शेतीच्या पोट खराब क्षेत्रफळाची नोंद होत नसल्याने ७/१२ व ८-अ उताऱ्यामधील क्षेत्रफळात तफावत दिसून येत असल्याचे दिनांक ०२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार ऑनलाईन नोंद करणा-या सॉफ्टवेअरमधील त्रृटी दूर करून शेतक-यांना बिनचूक ७/१२ व ८-अ चे उतारे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१८) :** (१) गा.न.नं.७/१२ मध्ये पोटखराबा क्षेत्र स्वतंत्रपणे दाखविले जाते. तर गा.न.नं.८ अ हा नमूना धारण जमिनीची नोंदवही असून त्यात जमीन महसूल व उपकराचे दायित्व दर्शविण्यात येते. केवळ लागवडीलायक जमीन ही आकारणी योग्य जमीन असून पोटखराबा क्षेत्राला आकारणी केली जात नसते. त्यामुळे गा.न.नं. ८ अ मध्ये पोटखराबा क्षेत्र दर्शविण्यात येत नाही. सॉफ्टवेअर मधील त्रृटीमुळे गा.न.नं. ८-अ उताऱ्यामध्ये शेतीच्या पोट खराब क्षेत्रफळाची नोंद होत नसल्याने गा.न.नं. ७/१२ व गा.न.नं. ८-अ उताऱ्यांमधील क्षेत्रफळात तफावत दिसून येते, हे विधान वस्तुस्थितीदर्शक नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वांद्रे रेक्लमेशनच्या पुलाचे संरक्षक कठडे तुटल्याने अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१४) ८५९६४ (२३-०८-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम-वांद्रे दरम्यान असलेल्या वांद्रे रेक्लमेशनच्या पुलाचे संरक्षक कठडे तुटले असून येथील धोकादायक वळणामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या पुलाची पाहणी करुन येथे दिवे लावण्याबाबत तसेच सुरक्षित कठडे तातडीने बनवून पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०१८) :** (१), (२) व (३) नाही. तथापि वाहनचालकांच्या मार्गदर्शनासाठी व सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच माहीम उड्डाणपुलाच्या वळणावर IRC मानकाप्रमाणे अतिरिक्त थर्मोप्लास्टिक पेंटचे मार्किंग करण्यात आले असून रोड स्टड लावण्यात आले आहेत. उड्डाणपुलाच्या पदपथावरील सर्व दिवे सद्यस्थितीत कार्यान्वित असून, दिवे बंद झाल्यास ते कंत्राटदाराकडून तातडीने दुरूस्त करण्यात येतात.

---

**ठाणे येथील खारेगावमधील मफतलाल इंजिनिअरींग कंपनीतील कामगारांची देणी देण्याबाबत**

**(१५) ८६०३५ (०४-०९-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील खारेगावमधील मफतलाल इंजिनिअरींग कंपनीतील २९८८ कामगारांची देणी देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात तसेच वारंवार मा.महसुलमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे जमिन विक्री करण्यासंदर्भात केलेल्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री व मा.महसुलमंत्री यांची बैठक घऊन निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या कामगारांना त्यांची देणी देण्यासाठी झालेल्या निर्णयानुसार कंपनीची जमिनविक्री करुन कामगारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०१-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

Company Application (Loddg.) No.५३६/२०१६ in Company Petition No.७४३/१९९० in the matter between "United Metachem Pvt.Ltd. Versus Official Liquidator in respect of M/s. Mafatlal Engineering Industries Ltd." प्रकरणी मा.न्यायालयाचे दि.८.३.२०१७ रोजीचे आदेश विचारात घेता, मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील मफतलाल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लि. या कंपनीला भूसंपादन करुन दिलेल्या जमिनीपैकी क्षेत्र ३३-२३-८ हे.आर. जमिनीची विक्री करण्यास अटी व शर्तीस अधीन राहून शासन मान्यतेने शासन ज्ञापन क्र.न्यायप्र-१०/ २०१६/ प्र.क्र.११५/अ-२, दि.२२.४.२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच मफतलाल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लि. या कंपनीला शासनामार्फत प्रदान करण्यात आलेल्या क्षेत्र ४-६१-५ हे.आर. जमिनीच्या अनुषंगाने शासन निर्णय, दि.२१.११.१९५७ च्या तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना महसूल शाखेच्या शासन पत्र दि.२१.४.२०१७ अन्वये कळविण्यात आलेले आहे. विषयांकित जमीन विक्री करणेबाबतची प्रक्रिया ऑफिसिअल लिक्विडेटर, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत सुरु करण्यात आलेले आहे.
(३) मा.उच्च न्यायालयात दाख़ल Company Petition No.७४३/१९९० मध्ये पुढील होणा-या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जेएसडब्ल्यु सिमेंट व पोलाद कारखान्याच्या व्यवस्थापनाने शेतक-यांच्या जमिनीमधून जलवाहिन्या टाकल्याबाबत

**(१६) ८७८१७ (१२-०८-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडखळ-डोलवी (नागोठणे) (ता.रोहा, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यु सिमेंट व पोलाद कारखान्याच्या व्यवस्थापनाने शेतक-यांच्या जमीनीमधून जलवाहिन्या टाकल्या असल्याच्या तक्रारी शेतक-यांनी जिल्हा प्रशासन व पोलीसांकडे वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून जलवाहिन्या टाकणाऱ्या कारखाना व्यवस्थापनावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०१-२०१८)** : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर पाईपलाईन जे.एस.डब्ल्यू स्टील प्रशासनाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकरिता संपादित केलेल्या क्षेत्रामध्ये टाकली असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निंबधक कार्यालयातील विविध समस्यांबाबत**

**(१७) ८८७३८ (२३-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निंबधक कार्यालयात अपुरी जागा, दस्तांच्या फायलींची संख्या, दस्त लेखनिकांची जादा संख्या, लाईटच्या अनियमिततेमुळे सर्वर डाऊन होणे इत्यादी विविध समस्या असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे कामांवर परिणाम होत असून नागरिकांनाही अनेक अडचणीना सामोरे जा वे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयासाठी जागा अपुरी आहे. तथापि, तहसील आवारात नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु आहे. त्यामध्ये मानकानुसार दुय्यम निबंधक कार्यालयासाठी जागा उपलब्ध होणार आहे.

सेंट्रल सर्व्हर मुंबई येथील स्टेट डेटा सेंटरमध्ये स्थापित असल्याने स्थानिक लाईटच्या अनियमिततेमुळे सर्व्हर डाऊन होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(२) माहे एप्रिल, २०१७ मध्ये एक दिवस व जून, २०१७ मध्ये काही तासाच्या कालावधीकरीता कनेक्टिव्हीटी खंडीत झाल्यामुळे कामकाज बंद होते. सध्या कार्यालयातील संगणकीकृत कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे विंग (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील मंडळ अधिकाऱ्यांनी चुकीच्या पध्दतीने फेरफार केल्याबाबत**

**(१८) ९००९१ (१९-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विंग (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील मंडळ अधिकारी यांनी ९४४ क्रमांकाची फेरफार चुकीच्या पध्दतीने मयत व्यक्तीच्या नावे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या प्रकरणातील दोषी मंडळ अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) सामाजिक कार्यकर्ते श्री.दरबारसिंग जगन्नाथ साळुंखे यांनी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी दिलेला लेखी तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून उपविभागीय अधिकारी, वाई यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आला होता. या प्रकरणी खरेदी देणारांच्या वारसांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ प्रमाणे दाखल अपिलावर उपविभागीय अधिकारी, फलटण यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी अपिलात घेतलेल्या हरकती या दिवाणी स्वरुपाच्या असल्याने फेरफार क्र. ९४४ बाबत मंडळ अधिकारी शिरवळ यांनी घेतलेला निर्णय कायम असल्याबाबतचे आदेश दिनांक १७.०७.२०१७ रोजी पारीत केले आहेत.

---

## मुंबईतील आरक्षित जमिनीचा विकास करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१९) ९०५५५ (१२-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आरक्षित जमिनीचा विकास करण्यासाठी मुंबई महापालिकेने ५४० कोटीचा निधी जिल्हाधिका-यांना देवूनही १६६ प्रस्ताव मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रलंबित प्रस्ताव मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाशी १२३ तर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाशी ४४ प्रस्ताव असे एकूण १६७ प्रस्ताव संबंधित आहेत.
अ) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील एकूण ४४ प्रस्तावांपैकी १३ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.
उर्वरित ३१ प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अप्राप्त - ९

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले - १७

३) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - ३

४) निवाडा घोषित परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताबा न घेतलेले - २

ब) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील एकूण १२३ प्रस्तावांपैकी ५४ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ६९ प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले प्रस्ताव-५६

२) आरक्षण रद्द परंतु प्रस्ताव अप्राप्त - १

३) निवाडा घोषित करुन ताबा देणेसाठी - ६

४) कार्यालयास अपाप्त - ३

५) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - २

६) यादित दुबार असलेली प्रकरणे - १

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावांसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे सुमारे रु.२९४.७० कोटी इतका निधी जमा आहे.(प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु. २४७.४५ कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ४७.२५ कोटी) आणि जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सुमारे रु.५७.५३ कोटी इतका निधी जमा आहे. (प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु. ४६.५० कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ११.०३ कोटी) अशी एकूण सुमारे रु.३५२.२३ कोटी निधी रक्कम जमा आहे.

(२) व (३) मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी रखडलेली भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन संबंधित जिल्हाधिकारी यांना शासन पत्र क्र.विसताप्र-०७/२०१७/प्र.क्र.१०७/अ-२, दि.०८/०८/२०१७ अन्वये आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.१०.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत विषयांकीत प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही तातडीने करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.२४.११.२०१७ रोजीच्या पत्रानुसार प्रलंबित प्रकरणांमध्ये संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून भूसंपादनाची प्रक्रिया जलद गतीने करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील पूर्व द्रूतगती महामार्गावरील (चेंबूर) अमर महल उड्डाणपुलाची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याबाबत

**(२०) ९१२९८ (२३-०८-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन**

**सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व द्रुतगती महामार्गावरील अमर महल या ठिकाणच्या उड्डाणपूलाचे काही सांधे अचानक तुटल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०१७ वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उड्डाणपूलाच्या गर्डरचा काही भाग नादुरुस्त झाल्याने या पुलास धोका निर्माण झाला असल्याचेही दिनांक १४ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीकरिता चार महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने सदर पुल वाहतूकीस बंद करण्यात आल्याने मुंबई बाहेर ठाण्याकडे जाणाऱ्या वाहनांच्या वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती वा पुनर्बांधणी करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने पवई आयआयटीचे प्राध्यापक डॉ. रवी सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती गठित केली असून दिनांक ३० एप्रिलपर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय तसेच सदर उड्डाणपुलाची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार वा करित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे. सदर बाब दि.६ एप्रिल,२०१७ रोजी निदर्शनास आली आहे.

(३) सदर पुलाच्या दुरूस्तीकरीता ११ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या पुलावरून मुंबई ते ठाणे मार्गिका संपूर्ण बंद करण्यात आलेली असून, पुलाच्या ठाणे मुंबई वाहिनीच्या उपलब्ध तीन मार्गिकेपैकी एक मार्गिका मुंबई ते ठाणे या वाहतुकीकरीता Counter Lane म्हणून हलक्या वाहनांकरीता वापरण्यात येत आहे. तसेच मुंबई ते ठाणे या दिशेची जड वाहतूक पुलाखालील सेवा रस्त्यावरून सुरू आहे. सद्यस्थितीत वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(४) हे खरे आहे.

(५) तज्ञ समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यानुसार पुलाचे सुपरस्ट्रक्चर बदलण्याची निविदा निश्चित करून दि.९.६.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. पुलाच्या मुंबई ठाणे मार्गिकेच्या सुपरस्ट्रक्चरचे Dismantling काम पूर्ण झाले आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी ११ महिने आहे, परंतु मेट्रो-४ लाईनचे कामासाठी पुलाची उंची कमी करावी लागणार असल्याने सदर काम पूर्ण करण्यास आणखी कालावधी लागणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील भूमिअभिलेख व महसूल विभागातील कागदपत्र स्कॅन करुन इंटरनेटवर अपलोड करण्याचे काम देण्यात आलेल्या कामगारांना देयके देण्याबाबत

**(२१) ९१७३२ (१२-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील भूमि अभिलेख व महसूल विभागातील कागदपत्रे स्कॅन करुन इंटरनेटवर अपलोड करण्याचे काम देण्यात आलेल्या संस्थेशी केलेला करार संपला असून कामाची देयके कामगारांना पाच महिन्यापासून मिळाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना त्यांच्या कामाची देयके न मिळाल्यामुळे त्यांनी संपूर्ण स्कॅनिंगच्या साहित्यासह महसूल विभागाची संपूर्ण आवश्यक माहिती ओलीस ठेवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर कामगारांना त्यांच्या कामांची देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१८) :** (१) व (२) बुलढाणा जिल्ह्यातील स्कॅनिंग कामी मे. रिको इंडिया लिमिटेड या कंपनीची निवड करण्यात आली होती परंतु त्या कंपनीचे कामकाज समाधान कारक नसल्यामुळे स्कॅनिंग कामाबाबत त्या कंपनीशी केलेला करार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडुन नियमानुसार रद्द करण्यात आला. सदर संस्थेमार्फत नियुक्त खाजगी कामगारांना कामाची देयके देण्याची बाब ही संबंधित संस्थेची अंतर्गत बाब आहे.

स्कॅनिंग करण्याचे साहित्य हे संबंधित कंपनीचेच असल्यामुळे त्या साहित्याचा शासनाशी संबंध नाही. तसेच महसूल विभागाची माहिती ओलीस ठेवली आहे ही बाब खरी नसून महसूल व भूमि अभिलेख विभागाचे अभिलेख सुरक्षित आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे-वरळी सी लिंकवरील टोल वसूलीच्या कंत्राटाबाबत

**(२२) ९२८७५ (१९-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-वरळी सी लिंकवरील टोल वसूलीचे कंत्राट दिलेल्या खाजगी कंपनीला टोल वसूलीची मुदत सन २०३९ पर्यंत देण्यात आली असून त्यामध्ये आखणी २० वर्षानी वाढ करुन सन २०५९ पर्यंत टोल वसूली करण्यास मंजूरी द्यावी असा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळानी (एमएसआरडीसी) मान्येतसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे-वरळी सी लिंक प्रकल्प उभारण्यासाठी किती हजार कोटी रुपये खर्च झाले व सदर रस्त्याच्या टोल वसूलीतून आतापर्यंत किती रक्कम वसूल झाली आहे,
(३) तसेच, सदर कंपनीला सन २०३९ ऐवजी सन २०५९ पर्यंत टोल वसूलीची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव पाठविण्याची कारणे काय आहेत व या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१८) :** (१) शासन निर्णय क्र.बांवस-२००४/प्र.क्र.६४/२००४/रस्ते-६ दि. ४.१२.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सन २०५२ पर्यंत सवलत कालावधी वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) वांद्रे-वरळी सी लिंक प्रकल्प उभारण्यासाठी रु.१९७५ कोटी इतका खर्च झाला आहे. माहे जानेवारी २०१८ अखेरपर्यंत रु.८५८.३३ कोटी इतकी पथकर वसुली झाली आहे.
(३) प्रकल्पाच्या मूळ मंजुरीपासून ते प्रकल्प पुर्ण होईपर्यंत प्रकल्पाची मुळ किंमत रु.६६६ कोटी वरुन रु.१९७५ कोटी पर्यंत गेली.

सदर प्रकल्प कार्यान्वित करताना प्रकल्पाच्या भावातील बदल, वाढीव बांधकाम कालावधी व तद्नुषंगिक भाववाढ, पर्यावरण विषयक हरकती, संकल्पचित्रातील बदल, केबल स्टेड पुलामधील वावाचा बदल, बांधकामातील निश्चित आवश्यक अशी संख्यात्मक तफावत, अतिरिक्त खर्च (सिग्नल, पथदिवे स्थलांतरणाचा खर्च इत्यादी) या प्रकल्पासाठी महामंडळास व्यवहार्यता तफावत निधीपोटी देय असलेली रू.५८० कोटीची रक्कम वेळेत न मिळणे इत्यादी कारणामुळे प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीत वाढ झाली.

याकरिता शासन निर्णय क्र.बांवस-२००४/प्र.क्र.६४/२००४/रस्ते-६, दि. ४.१२.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सन २०५२ पर्यंत सवलत कालावधी वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

### भिवंडी येथील विद्यार्थ्यांना वविध दाखले विहित मुदतीत मिळत नसल्याबाबत

**(२३) ९३२०८ (१२-०८-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नॉनक्रिमिलेअर, उत्पन्न, अधिवास व जातीचे दाखले विहित मुदतीत मिळत नसल्याबाबतची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१८) :** (१) याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) भिवंडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच तालुक्यातील सर्व लोकांना जात प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर, उत्पन्न, वय राष्ट्रीयत्व व अधिवास इत्यादी दाखले विहित मुदतीत अदा करण्याकरीता योग्य त्या सूचना जिल्हाधिकारी यांचेमार्फत सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणास्तव दाखले लवकरात लवकर प्रदान करणे शक्य व्हावे या करीता शिबीरे आयेजित करुन दाखल्यांचे वितरण करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रॉकी हिल, मुंबई येथील शासकीय वसाहतीमधील मार्ग नागरिकांच्या रहदारीसाठी खुला करण्याबाबत**

**(२४) ९३२२३ (१२-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नारायण दाभोळकर मार्गावर असलेल्या रॉकी हिल या शासकीय वसाहतीमधील मार्ग मोठा लोखंडी गेट बसवून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता बंद केल्यामुळे नागरिकांना रहदारी करणे अडचणीचे होत असून रस्ता बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रस्ता रहदारीसाठी खुला करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ तसेच दिनांक १२ मे, २०१७ रोजी व स्थानिक नागरिकांनी दिनांक ०५ऑगस्ट, २०१५ तसेच दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर रस्ता रहदारीसाठी खुला करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर वसाहतीतील न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दोन्ही लोखंडी प्रवेशद्वार नागरिकांना रहदारीसाठी बंद करण्यात आले आहेत.
(३) होय.
(४) सदर वसाहतीतील मा.न्यायमूर्तीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून वसाहतीतील रस्ता लोखंडी प्रवेशद्वार लावून बंद करण्यात आला आहे. सदर रस्ता नागरिकांसाठी खुला करण्यासाठी मा.न्यायमूर्ती, मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व गृह विभाग यांच्या समन्वयाने निर्णय अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे येथील ससून रुग्णालयाच्या इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ९३६८५ (१९-०८-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयाच्या अकरा मजली इमारतीचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीसाठी उपलब्ध असलेल्या ८० कोटी रुपयांपैकी तीन कोटी रुपये वर्षभरात खर्च करण्यात येऊन उर्वरित इमारतीच्या अंतर्गत सुविधांसाठी १०९ कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्याने निधीचा वापर करता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रक्रिया पूर्ण करून इमारतीचे बांधकाम तसेच इमारतीमध्ये अंतर्गत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) इमारतीचे स्थापत्य काम पूर्णत्वाकडे आहे. इमारतीतील Electrical, Fire fighting & fire alarm, Bus bar trunking system, L.V. system व इतर कामे प्रगतीपथावर आहेत.

Furniture, Modular O.Y., CSSD व इतर बाबींची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

(२) ससून रूग्णालयाच्या ११ मजली विस्तारित इमारतीमध्ये अंतर्गत सुविधा कामासाठी रु.६२.१७ कोटी अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. बहुमजली इमारतीचे चालू कामावर रु.४.१४ कोटी चे प्रदान करणेत आले. इमारतीतील Electrical, Fire fighting & fire alarm, Bus bar trunking system, L.V. system व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. त्यासाठी रु.३८.०० कोटी कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना वितरीत करण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्यात गत चार वर्षात ४ लाख ८० हजार ६५२ रस्ते अपघात झाल्याबाबत

**(२६) ९५७१२ (२१-१२-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग विभागाने सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्र राज्यात गत चार वर्षात ४ लाख ८० हजार ६५२ अपघात झाले असून दररोज ११० अपघात होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अपघातांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींमध्ये १८ ते ३५ वयातील तरुण मुलांचा सर्वाधिक समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून राज्यातील रस्त्यांवरील अपघात रोखण्यासाठी व रस्ते सुरक्षीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०१-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्यात सन २०१४ ते सप्टेंबर २०१७ च्या आकडेवारी प्रमाणे एकूण १,९७,६७१ वाहनाच्या अपघाताची नोंद असून दररोज ११० पेक्षा जास्त अपघात होत असल्याचे अपर पोलीस महासंचालक (वा.),महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.
(२) सदरहू बाबत माहिती उपलब्ध नसल्याचे अपर पोलीस महासंचालक (वा.),महाराष्ट्र राज्य,यांनी कळविले आहे.
(३) रस्त्यांवरील अपघात रोखण्यासाठी केंद्रीय रस्ते,वाहतूक व महामार्ग यांच्या वेळोवेळी प्राप्त होणा-या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे रस्ते सुरक्षित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, उदा.वळणे कमी करणे,वाहनांचा वेग नियमित करणे,विविध मार्गदर्शक फलक लावणे,रंबलर स्ट्रींप लावणे इ.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो.वरुडे (ता.राजगुरुनगर, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांच्या विहिरीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२७) ९५८१६ (२२-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.वरुडे (ता.राजगुरुनगर, जि.पुणे) येथील गट नं.१०५९ मधील क्षेत्र ४१ आर पैकी १ आर येथे असलेल्या शेतकऱ्यांच्या विहिरीवर अतिक्रमण करुन ती बुझविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांच्या कुटुंबियांनी जिल्हाधिकारी, पुणे, मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखी निवेदन देऊन सुद्धा अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त शेतकऱ्याच्या विहिरीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०१-२०१८) :** (१) होय.
(२) अर्जदार श्री. दत्तात्रय कोंडिंबा तांबे यांनी मौ. वरूडे, ता.खेड येथील गट नं. १०५९ चे निमताना मोजणी कामी दि. २०.०२.२०१४ रोजी अर्ज केला होता. त्यानुसार उपअधिक्षक भूमि अभिलेख, खेड यांचे मार्फत करण्यात आलेल्या निमताना मोजणीप्रमाणे प्रश्नांकित विहिर सरकारी नदी पात्रात येत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापी सदर मोजणी अर्जदारास अमान्य असल्याने अर्जदारांनी जिल्हाअधिक्षक भूमि अभिलेख, पुणे यांचेकडे अपील दाखल केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती महसुल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२८) ९५८७८ (२२-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती महसुल विभागातील विभागीय आयुक्त कार्यालयातील अप्पर आयुक्तांसह जिल्ह्यातील अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदांचा अनुशेष असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे प्रलंबित झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून अमरावती महसुल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अपर आयुक्त, उप आयुक्त (महसूल), उप आयुक्त (सामान्य प्रशासन), उप आयुक्त (रो.ह.यो), उप आयुक्त (करमणूक कर शुल्क) अशी ०५ पदे रिक्त होती. तसेच अपर जिल्हाधिकारी बुलडाणा, अकोला ही ०२ पदे रिक्त होती.
अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर आयुक्त, उप आयुक्त (महसूल), उप आयुक्त (रो.ह.यो) व अपर जिल्हाधिकारी, अकोला व बुलडाणा अशी एकूण ०५ पदे भरण्यात आलेली असून सदर पदांवर अधिकारी रुजू झालेले आहेत. उर्वरित रिक्त पदांचा कार्यभार अतिरिक्त स्वरुपात इतर अधिका-यांकडे सोपविण्यात आलेला असल्यामुळे नागरीकांची कामे प्रलंबित राहिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कशेडी ते झाराप (जि.सिंधुदूर्ग) या मार्गाच्या कामास सुरुवात झाली नसल्याबाबत**

**(२९) ९६०६८ (२१-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेडी ते झाराप (जि.सिंधुदूर्ग) या मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामास दिनांक २७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रशासकीय मंजूरी मिळाली असून अद्यापपर्यंत कामास सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कणकवली-झाराप या महामार्गाचे काम करणाऱ्या कंपनीच्या ठेकेदारांनी खडडे बुजविण्याचे काम करतांना ऑईल असलेले डांबर वापरल्यामुळे खड्डे पडून रस्त्याची दूरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कशेडी ते झाराप या मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामास सुरुवात करुन कणकवली -झाराप या महामार्गामधील खड्डे बुझविन्याबाबत तसेच या रस्त्याच्या कामात ऑईल असलेले डांबर वापरणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कशेडी ते झाराप या भागातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ ची २८८.५७ कि.मी. लांबी चौपदीकरणासाठी असून परशुराम ते खारशेत (२०५/४०० ते २४१/३००), आरवली ते कांटे (२४१/३०० ते २८१/३००), निवळी ते वाकेड (२८१/३०० ते ३३२/२००), संभाजीनगर ते कळमठ(३६७/३०० ते ४०६/०३०) या चार टप्प्यात प्रत्यक्ष काम सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर व कोकणला जोडणाऱ्या तालुक्यातील करूळ व भुईबावडा घाटातील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३०) ९६०७७ (२१-१२-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व कोकणला जोडणाऱ्या करूळ घाट व भुईबावडा (कोल्हापूर विजयदुर्ग राज्यमार्ग क्र. ११५) घाटातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याच्या बाजूच्या संरक्षण भिंती कोसळल्याने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे व सार्वजनीक बांधकाम

विभागाकडून या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारेपाटण-भुईबावडा-पाचल या मार्गावरील साईडपट्ट्या खचल्या असून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्यामुळे रस्त्याची दुरवस्था होऊन प्रवास करणे गैरसोयीचे झाल्याचे व कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०१८) :** (१) व (२) प्रश्नांकित करुळ घाट रा.मा.१७७ चा भाग असून लांबी ९ कि.मी. आहे. भुईबावडा घाट रा.मा.१७१ चा भाग असून लांबी ९ कि.मी. आहे. या दोन्ही घाट रस्त्यावीर काही ठिकाणी रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडले होते, काही ठिकाणी संरक्षक भिंती क्षतिग्रस्त झाल्या होत्या काही ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्यावर आलेल्या दरडी हटविण्यात आल्या आहेत. संरक्षक भिंत दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून निधिच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदयस्थितीत या दोन्ही घाटातून वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावळगुंडवाडी (ता.जत,जि.सांगली) हे गाव जत तालुक्यातच ठेवण्याबाबत**

**(३१) ९६१७६ (२१-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावळगुंडवाडी (ता.जत, जि.सांगली) हे गाव जत तालुक्यातच ठेवण्यात यावे याकरिता तेथील ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय आयुक्त पुणे तसेच शासनाला दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) होय.

(२) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून, ते प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकीय वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३२) ९६१८८ (२२-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रविनगर, नागभवन, आमदार निवास येथील शासकीय वसाहतीमधील इमारतीची अनेक वर्षापासुन दुरूस्ती, रंगरंगोटी, बुझलेली गडरलाईन, फुटलेली पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, जुन्या झालेल्या विद्युत तारा, रस्त्यांवर पडलेली खड्डे, वाढलेली झाडे-झुडपी, परीसरात पसरलेली घाण, तसेच साफ-सफाई कर्मचाऱ्यांची कमी संख्या याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले असून यामुळे तेथील रहिवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसाहतीमधील कामांकरीता गत वर्षी निधीची तरतुद करण्यात आली परंतु सदर निधीतून अद्यापपर्यंत कोणतेही काम करण्यात आले नसल्याने या कामांकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत तेथील रहिवाशांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी अर्ज करून सुध्दा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच हिवाळी अधिवेशन, २०१७ मध्ये या वसाहतीच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतुद करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या वसाहतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच दुरुस्तीच्या कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) रविनगर वसाहतीमधील कामांकरीता गत वर्षी निधीची स्वतंत्र तरतूद प्राप्त झाली नाही. तथापि, सदर परिसरातील निवासस्थानांच्या देखभाल व दुरूस्तीवर सन २०१६-१७ मध्ये रू.१३०.०० लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.
(३) डिसेंबर, २०१७ च्या पुरवणी अर्थसंकल्पात निधी उपलब्धतेकरीता रु.७.५० कोटी किंमतीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तथापि सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली नाही. मार्च, २०१८ चे अर्थसंकल्पात निधी उपलब्धतेकरीता पुन:श्च प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुका सचिवालय व परीसरातील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीबाबतचा वाणिज्य वापराचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ९६४८५ (२१-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना येवला (जि.नाशिक) तालुका सचिवालय इमारत व परीसरातील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी वाणिज्य वापराचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिनांक ११ ऑगस्ट २०१७ च्या पत्रान्वये दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) गाळे बांधण्याकरीता उपलब्ध असलेल्या जागेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे पथकिनारावर्ती नियम व महसूल विभागाचे विकसन नियम विचारात घेऊन प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**होतळे व डोंगरगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील शेतक-यांच्या जमिनी सुजाता फार्म्स प्रा.लि. कंपनीने अवैधरित्या खरेदी केल्याबाबत**

**(३४) ९६५८९ (२१-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होतळे व डोंगरगाव (ता.मुळशी, जि.पुणे) या दोन गावातील शेतक-यांच्या जमिनी सुजाता फार्म्स प्रा.लि. कंपनीने शेतजमीन कायदा व अन्य कायद्यांचा भंग करुन खरेदी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आरोपांबाबत ३ महिन्यांत चौकशी करुन योग्य तो निर्णय घेण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने पुणे जिल्हाधिका-यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार अवैधरितीने शेतकऱ्यांची जमीन खरेदी करणाऱ्या सुजाता फार्म्स प्रा.लि. या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१८) :** (१) जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.११/०८/२०१६ च्या आदेशाने सदर प्रकरणी चौकशी करणेसाठी उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांची नियुक्ती केली आहे.
(२) होय.
(३) व (४) तक्रार अर्जदार यांनी दि.२१/०२/२०११ रोजी केलेल्या तक्रारीमधील मुद्दे हे वेगवेगळया विभागांशी संबंधित असल्याने सदर प्रकरणी चौकशी करुन एकत्रितरित्या कार्यवाही करण्यासाठी

जिल्हाधिकारी, पुणे यांनी उप विभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावर करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील लमाण तांड्याना स्मशानभूमीसाठी जमीन देण्याबाबत**

**(३५) ९६७९६ (२१-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील १८३ लमाण तांड्यांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती जिल्ह्याधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मशानभूमीसाठी प्रत्येक तांड्याला १ गुंठा जमीन देण्याची मागणी अद्यापही मान्य करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून लमाण तांड्यांना स्मशानभूमीसाठी जमीन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१८) :** (१) लातूर जिल्हयातील १८३ लमाण तांडयांना स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) ज्या ठिकाणी स्मशानभुमी उपलब्ध नाही त्याठिकाणी जमीन मागणीबाबतचा प्रस्ताव संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यास स्मशानभुमीसाठी जागा मंजूर करण्यात येते.
(३) ज्या गावामध्ये स्मशानभुमी उपलब्ध नाही त्या ठिकाणी सरकारी गायरान जमीन, खाजगी जमीन संपादन करुन स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयाच्या दि.१०.११.२०१७ च्या परिपत्रकान्वये सर्व उपविभागीय अधिकारी/ तहसीलदार यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**लातूर जिल्ह्यात महाराजस्व अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३६) ९६८०२ (२१-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात महाराजस्व अभियान अंतर्गत महसूल रेकॉर्ड अद्यावत करणे,मयत खातेदारांच्या वारसाच्या नोंदी अद्यावत करणे, शासनाच्या विविध योजनांची गावपातळीवर प्रसिद्धी करणे, अनधिकृत अकृषी वापराची वसुली करणे इत्यादी कामे करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे आदेश असतानाही लातूर जिल्ह्यात या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) महाराजस्व अभियानांतर्गत शिबीराचे आयोजन करुन विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे रेल्वे स्टेशनवर पूल बांधण्याबाबत**

**(३७) ९७१२३ (२१-१२-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे रेल्वे स्टेशनवर पूल बांधण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१८) :** (१) होय.

(२) उड्डाण पुलाचे बांधकामास दि.१८/१२/२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराड (जि.सातारा) शहरासाठी बाह्यवळण रस्ता बांधण्याबाबत**

**(३८) ९७८९२ (२१-१२-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) शहरातील पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर व इतर रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत असल्याने कराड शहराबाहेरुन बाहय वळण रस्ता बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कराड शहरासाठी बाहय वळण रस्ता बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रस्तावित बाह्यवळण मार्गातील काही लांबी, कराड-तासगांव राज्य मार्ग १४२ व कराड-विटा राज्यमार्ग १३६ हे रस्ते अनुक्रमे राष्ट्रीय महामार्ग २६६ व राष्ट्रीय महामार्ग १६६-ई म्हणून घोषित झाले आहेत. या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, कोल्हापूर, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर त्यांचे सल्लागार तसेच नगर रचना कार्यालयाचे अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सातारा यांच्याकडून कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथील लिपिक व नायब तहसीलदार यांच्या मागण्यांबाबत**

**(३९) ९७९६४ (२१-१२-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथील लिपिक व नायब तहसीलदार यांच्या मान्य केलेल्या १० मागण्यांबाबत गत ३ वर्षात कोणतीही अंमलबजावणी न झाल्याने त्यांनी कामबंद आंदोलन पुकारले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम बंद आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या मान्य केलेल्या मागण्यावर अंमलबजावणी कारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.१०.१०.२०१७ पासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन केले होते. सदर कामबंद आंदोलनामुळे कार्यालयीन कामकाजावर प्रतिकूल परिणाम झाला होता. परंतू,या कामबंद आंदोलन व मागण्यांच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.१०.२०१७ रोजी बैठक पार पडली व सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संघटनेने आंदोलन मागे घेतले. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संघटनेच्या मागण्यांबाबत यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या पूर्व भागातील रस्ते व रस्त्यावरील साईडपट्ट्या यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४०) ९८११८ (२१-१२-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या पूर्व भागातील रस्ते व रस्त्यावरील साईडपट्ट्या यांची दुरवस्था झाली असल्याने व रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडी वाढली असल्याने नागरिकांना प्रवास करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत तसेच रस्त्यावर येणारी झाडी कापण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत व रस्त्यावर येणारी झाडी कापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१८) :** (१) नाही.

तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील ३ रस्त्यांची लांबी ६३.१६ कि.मी. असून रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरण्यात आले असून रस्त्यालगत वाढलेली झाडी काढून टाकण्यात आली आहेत. या रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे. या रस्त्याची वेळोवेळी आवश्यक दुरुस्ती करुन रस्ते वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्याचे नियोजन आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट अभियंता पुरस्काराबाबत**

**(४१) ९८४७९ (२१-१२-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियंता दिनाचे औचित्य साधून राज्य शासनाकडून सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, उर्जा, पाणी पुरवठा विभागात चांगली कामगिरी करणाऱ्या अभियंत्यांना दिनांक १५ सप्टेंबरच्या जवळपास उत्कृष्ट अभियंता म्हणून गौरविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून देण्यात येनाऱ्या उत्कृष्ट अभियंता पुरस्कारांची गत पाच वर्षापासून घोषणा झाली नसल्याने राज्यातील अभियंत्यांचे सदर पुरस्कार रखडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्कृष्ट अभियंता पुरस्काराची घोषणा न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून उत्कृष्ट अभियंता पुरस्काराची घोषणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०१-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अभियंत्यांना वैयक्तिक सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या हस्ते प्रदान करून, गौरव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या विभागातील अभियंत्यांना “उत्कृष्ट अभियंता” पुरस्कार प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून “उत्कृष्ट अभियंता” पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांची तारीख व वेळ मिळणेबाबत मा.राज्यपालांचे प्रधान सचिव यांना विनंती करण्यात आली आहे. “उत्कृष्ट अभियंता” पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी मा.राज्यपाल महोदयांची तारीख व वेळ मिळाल्यानंतर याबाबतची पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-मुरबाड या राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ चे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(४२) ९८६०० (२२-१२-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-मुरबाड या राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ च्या चौपदरीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत असल्याची माहिती दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी दिली असताना सदरचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी लागणारी भूसंपादनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०१-२०१८) :** (१) व (२) होय.

केंद्र शासन रस्ते,वाहतूक व महामार्ग यांच्या वतीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत कल्याण-मुरबाड या रा.म.२२२ रस्त्याचे चौपदरीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

चौपदरीकरणाच्या कामासाठी भूसंपादनाची कार्यवाही सक्षम प्राधिकारी (भूसंपादन-कल्याण) यांच्यामार्फत प्रगतिपथावर असून भूसंपादनाचा निवाडा जाहीर केल्यानंतर त्यानुसार मोबदला वाटपाचे काम सक्षम प्राधिकारी (भूसंपादन) कल्याण यांच्या कार्यालयामार्फत करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पनवेल यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तलाठ्यामार्फत वितरित होणाऱ्या बेकायदेशीर दाखल्यांबाबत**

**(४३) ९९३४८ (२१-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तलाठ्यामार्फत वितरित होणाऱ्या बेकायदेशीर दाखल्यांबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री व मा.महसूल राज्यमंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१८) :** (१) याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) ई- डिस्ट्रीक्ट प्रकल्पांतर्गत नागरिकांना देण्यात येणारे विविध दाखले व प्रमाणपत्रे यांचे प्रमाणीकरण करणे व दाखले देण्याच्या पध्दतीत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दि. ३१ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तलाठी यांनी द्यावयाचे मिळकतीचे प्रमाणपत्र देण्याच्या पध्दतीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक दि. १८ ऑक्टोंबर २०१७ अन्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, तलाठी यांनी द्यावयाचा उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांच्याकडून उत्पन्नाचे

प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विहित करण्यात आला असून, सदर उत्पन्नाच्या दाखल्यास उत्पन्नाचे प्रमाणपत्र म्हणून स्वतंत्र वैधता नाही आणि उपरोक्त शासननिर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या प्रक्रियेव्दारे तहसिलदारांकडून देण्यात येणारे उत्पन्नाचे प्रमाणपत्र हेच वैध प्रमाणपत्र राहील.

तसेच उपरोक्त दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दि. ३१ मार्च, २०१२ च्या शासननिर्णयामध्ये कांही शब्द प्रयोगांमुळे प्रशासकीय स्तरावर कोणत्याही स्वरुपाची संदिग्धता राहू नये या दृष्टीने दि. ३ नोव्हेंबर २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये तलाठयाचा उत्पन्नाचा दाखल्यां ऐवजी "तलाठयाचा उत्पन्नाचा अहवाल" असे शुध्दीपत्रक निर्गिमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राहटेवाडी-तांमदर्डी ईजिमा-५२ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) या रस्त्यावरील पुलाच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

**(४४) १००२९८ (२१-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहटेवाडी-तांमदर्डी ईजिमा-५२ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) या रस्त्यावरील पुलाच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत लोकप्रतिनिधी पंढरपूर यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांच्याकडे दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरील पुलाच्या कामास याआधी प्रशासकीय मान्यता मिळाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार या पुलाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आर.आय.डी.एफ-२० मधील मंजूर ५० मीटर लांबीच्या पुलाची किंमत रुपये ११३.८९ लक्ष इतकी होती. तथापि, संकल्पचित्र मंडळाकडून मंजूर संकल्पानानुसार सदर कामाची किंमत रुपये ४६२.०० लक्ष झाल्यामुळे सदर कामाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता.

तथापि, आता सदर काम ग्राम विकास विभागाकडील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये समाविष्ट झाल्यामुळे, सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

**(४५) १००३५५ (०६-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचे काम शासनाने हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारक उभारणीचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर स्मारक उभारण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) कार्यारंभ आदेश दिल्यापासून ३६ महिन्यात काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी विविध विभागाच्या परवानग्या/ना हरकत दाखले प्राप्त करण्यात आले आहेत. प्रकल्पाचे स्वरूप विचारात घेऊन या प्रकल्पासाठी मे.ईजीस इंडीया कन्सल्टींग प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत तयार करण्यात आलेल्या प्रकल्प आराखड्यावर आधारीत निविदा मागविण्यात आल्या असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दर्यापूर मतदार संघातील चौसाळा येथील नदीपात्रातील पूल व रस्त्याबाबत

**(४६) १००४०७ (२१-१२-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौसाळा (ता.दर्यापूर, जि. अमरावती) या गावांतून बेलगंगा नदी वाहत असून या नदी पात्रातून चौसाळा ते निमखेड बाजार, हिरापूर, चिंचोना, सावरपानी इत्यादी गावांचा मुख्य रस्ता जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदी पात्रामध्ये पूल नसल्याने विध्यार्थी, नागरिक, रुग्ण यांना पावसाळ्यामध्ये जाण्या येण्याकरिता अडचणी निर्माण होतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौसाळा येथील नदीपात्रातील रस्त्याला पूल व रस्ता कधी पर्यंत करण्यात येईल नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तूत पूलाचे काम निकष, निधी व मंजूरी याच्या अधीनतेने हाती घेण्यात येईल

---

**आसेगांवदेवी (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील चोरउमरी या नाल्यावरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(४७) १००६६४ (२१-१२-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसेगांवदेवी (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) या भागातील २० ते २५ गावातील नागरीकांसाठी जाने येणे करण्यासाठी सोयीच्या असलेल्या गिमोना फाटा ते मांगलादेवी या ठिकाणांना जोडणा-या रस्त्यावरील चोरउमरी येथील नाल्यावर बांधकाम विभागाकडून पुलाचे बांधकाम न केल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे व याबाबत निवेदनही देण्यात आल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्यावरील चोर उमरी येथील नाल्यावर पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई यांनी केलेला गैरव्यवहार**

**(४८) १००९३७ (२१-१२-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई यांनी बनावट कामे करून व ठेकेदारांकडून त्या रक्कमेची मागणी करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यमंत्री यांनी दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी मुंबई विभागाच्या कामांच्या घेतलेल्या आढाव्यामध्ये या कामांवर आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) नाही. तथापि, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई या विभागांतर्गत "प्रशासकीय इमारत वांद्रे (पूर्व) येथील शौचालये नुतनीकरण करणे" या कामाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांना सखोल चौकशीचे निर्देश दिले आहेत. चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**राज्य व राष्ट्रीय महामार्ग असलेले अंतर्गत रस्ते डीनोटीफाईड करण्याबाबत**

**(४९) १०११६४ (२१-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाच्या ५०० मीटर अंतरापर्यंत दारुबंदी केल्यामुळे शहरातील राज्य व राष्ट्रीय महामार्ग असलेले अंतर्गत रस्ते डीनोटीफाईड करण्याबाबत अनेक प्राधिकरणांनी प्रस्ताव सादर केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास राज्य व राष्ट्रीय महामार्ग असलेले अंतर्गत रस्ते डीनोटीफाईड करण्याबाबत किती प्रस्ताव प्राप्त झाले व किती प्रस्तावावर कार्यवाही करण्यात आली,

(३) तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्ग असलेले अंतर्गत रस्ते डीनोटीफाईड केल्याने रस्त्यांच्या दुरुस्ती व देखभालीपोटी खर्च होणाऱ्या किती रकमेची बचत होणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय क्रमांक-आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१ मधील टिप ५ मध्ये, वेगवेगळया शहरांच्या बाबतीत ज्यावेळी वर्गीकृत रस्त्यांसाठी वळणरस्त्यांची बांधकामे पूर्ण होतील त्या-त्या वेळी शहरातून जाणारे वर्गीकृत रस्ते अवर्गीकृत करून सदर रस्त्यांचा ताबा संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदेला दयावा, असे नमुद आहे. त्यानुसार सन २०१७ मध्ये एकूण ३५ प्रस्ताव शासनास प्राप्त झाले व त्यापैकी २२ प्रस्तावावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) अवर्गीकृत केलेल्या रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीकरीता होणा-या खर्चात अंदाजे ७ लक्ष प्रति कि.मी. इतक्या निधीची बचत होईल.

---

**सातारा-रहिमतपूर (जि.सातारा) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५०) १०१२७१ (२१-१२-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-रहिमतपूर (जि.सातारा) या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडुन रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे सतत अपघात घडत असल्याचे व या रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधिताकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर विद्यार्थी तसेच ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात वर्दळ राहत असल्याने व रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहने चालविणे अडचणीचे ठरून गत दोन ते तीन महिन्यात अपघातात दहा ते बारा नागरिकांचा जीव गेल्याचेही माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करून तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१८) :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता रा.मा.१४० चा भाग आहे. रस्त्याची सातारा जिल्हयातील लांबी ८९.२०० कि.मी. आहे. या रस्त्याच्या डांबरीपृष्ठभागावर काही खड्डे पडले होते. हे खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(२) नाही.

या रस्त्यावर झालेले अपघात रस्त्याच्या दोषांमुळे झालेले नाहीत अशी नोंद पोलीस दप्तरी नमूद आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.